महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०६ वा | दिनांक : २०/०१/२०२५ | वार : सोमवार

# महाकुंभात आग-स्वयंपाक करताना सिलेंडरचा स्फोट ?



**प्रयागराज :** प्रयागराजमधील महाकुंभ मेळा परिसरात दुपारी साडेचार वाजता आग लागली. शास्त्री पुलाजवळील सेक्टर १९ मधील गीता प्रेस कॅम्पमध्ये ही आग लागली. आगीत गीता प्रेसच्या १८० कॉटेज जळून खाक झाल्या.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, स्वयंपाक करताना सिलिंडरचा स्फोट झाला. यानंतर अनेक सिलिंडरचा स्फोट झाला.

आग विझविण्यासाठी १२ अग्निशमन दलाच्या गाड्या पाठवण्यात आल्या. अग्निशमन दलाने सुमारे तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत ५० तंबू जळाले. तर, एका संन्याशाच्या एक लाख रुपयांच्या नोटाही जळाल्या.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मुख्यमंत्री योगींना फोन करून घटनेची संपूर्ण माहिती घेतली. आगीच्या घटनेच्या काही काळापूर्वी मुख्यमंत्री योगींनी हेलिकॉप्टरमधून महाकुंभमेळा परिसराची पाहणी केली होती.

महाकुंभ नगरीत अग्निशमन कार्यासाठी प्रगत वैशिष्ट्यांसह ४ आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर्स (AWT) तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये व्हिडिओ-थर्मल इमेजिंग सारख्या प्रगत प्रणाली आहेत. बहुमजली आणि उंच तंबूंमध्ये आग विझवण्यासाठी याचा वापर केला जातो. AWT ३५ मीटर उंचीपर्यंत आग विझवू शकते.

महाकुंभमेळा परिसर अग्निमुक्त करण्यासाठी, येथे ३५० हून अधिक अग्निशमन दल, २००० हून अधिक प्रशिक्षित मनुष्यबळ, ५० अग्निशमन केंद्रे आणि २० अग्निशमन चौक्या निर्माण करण्यात आल्या आहेत. आखाडे आणि तंबूंमध्ये अग्निसुरक्षा उपकरणे बसवण्यात आली आहेत.

गीता प्रेसचे विश्वस्त कृष्ण कुमार खेमका म्हणाले, "सुमारे १८० कॉटेज बांधण्यात आले होते. आम्ही त्या अतिशय काळजीपूर्वक बांधल्या. सर्वांना अग्निशामक काम करण्यास मनाई होती. जिथे आम्ही सीमा बांधली, तिथे आम्ही त्यापलीकडे एक सर्क्युलेटिव्ह क्षेत्र घोषित केले. प्रशासनाने ती जागा कोणाला दिली हे मला माहित नाही... त्या बाजूने आगीत काहीतरी आमच्याकडे आले आणि आग पसरली. आमचे काहीही शिल्लक राहिले नाही, सर्व काही नष्ट झाले. आमचे स्वयंपाकघर टिन शेडचे होते, ते काँक्रीटचे होते."

# मुंडे बहीण भाऊ माणुसकीला काळिमा फासणारे लोक - सारंगी महाजन



**बीड :** सारंगी महाजन यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी मंत्री धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. धनंजय मुंडेला आतमध्ये टाका, थोडे दिवस त्याला हवा खाऊ द्या, असे सारंगी महाजन म्हणाल्या आहेत. तसेच मुंडे बहीण भाऊ माणुसकीला काळिमा फासणारे लोक असल्याची टीका सारंगी महाजन यांनी केली आहे.

सारंगी महाजन यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, मला तर म्हणायचे आहे की तुम्ही धनंजयला सुद्धा आतमध्ये टाका. थोडे दिवस त्याला हवा खाऊ द्या. सरकारी जेवण जेऊ द्या. बरे वाटेल. मुंडे बहीण भाऊ माणुसकीला काळिलोक आहेत. त्यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी आले पाहिजे. त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले पाहिजे. करोडो रुपये घेऊन कुठे जाणार आहेत हे? यांना फक्त सहा फुटायच्या पांढऱ्या चादरीवर जायचे आहे. सगळे इथेच ठेवायचे आहे. तसेच मुंडे साहेबांनी इतके वर्ष कामावलेली इज्जत त्यांनी घालवली आहे. यात साहेबांची मुलगी पुतण्या दोघेही जबाबदार आहेत.

दरम्यान, सारंगी महाजन यांनी यापूर्वी देखील धानणजी मुंडे यांच्यावर आरोप केले आहेत. धनंजय मुंडे यांनी माझी जिरेवाडी येथील तीन कोटींची जमीन हडपली आहे. त्यात पंकजा मुंडे यांचाही हात आहे. धनंजय मुंडे यांच्या नोकराच्या नावावर ही जमीन करण्यात आली. मला धमक्या देऊन कोऱ्या बॉंडवर सह्या घेतल्या. सह्या केल्या नाही तर परळीमधून बाहेर जाऊ देणार नाही, अशी धमकी मला दिली होती. असा आरोप सारंगी महाजन यांनी केला होता.

तसेच साडेतीन करोड रुपयांची जमीन फक्त २१ लाखात घेतली तीन दिवसांत सातबारा ही त्यांनी बदलला. गोविंद मुंडे, त्याची सुन आणि दशरथ साठे यांच्या नावावर केली आहे. यानंतर धनंजय मुंडे यांना मी भेटले त्यानंतर ते टाळाटाळ करायला लागले, असा आरोप सारंगी महाजन यांनी यापूर्वी केला होता.

या विषयी बोलताना सारंगी महाजन म्हणाल्या होत्या, मी धनंजय मुंडे यांना हॉस्पिटलमध्ये भेटायला गेले त्यावेळी तो म्हणाला की मामी काळजी करु नको परळीत कुठलीही जमीन विकली तर मा फासणारे ती मला कळते. नंतर कळले की मी चोराकडेच आले आहे. साडेतीन करोड रुपयांची जमीन फक्त २१ लाखात घेतली तीन दिवसांत सातबारा ही त्यांनी बदलला. गोविंद मुंडे, त्याची सुन आणि दशरथ साठे यांच्या नावावर केली आहे.

# नागपुरात मोहन भागवतांच्या विरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

**नागपूर :** नागपूर येथे युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रमुख मोहन भागवत यांच्या निषेधार्थ मोर्चा काढला होता. मोहन भागवत यांनी केलेल्या विधानाच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात आला होता. शहरातील देवडिया काँग्रेस भवनमधून निघत कार्यकर्त्यांनी संघ मुख्यालयाच्या दिशेने मोर्चा काढला. मात्र, परवानगी नसलेल्या या मोर्चाला पोलिसांनी मध्येच रोखले आहे.

अयोध्येत २२ जानेवारी २०२४ रोजी श्री रामाची प्राणप्रतिष्ठा झाली तेव्हा देश खऱ्या अर्थाने मुक्त झाला, असे विधान सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले होते. त्यांच्या या विधानाच्या निषेध म्हणून युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हा मोर्चा काढला होता. संघाने आधी ध्वजाचा अवमान केला, आता स्वातंत्र्याचा अपमान करत आहे, अशा आशयाचे बॅनर घेऊन कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. यावेळी संघावर बंदी घालण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

संघाच्या मुख्यालयाच्या दिशेने निघालेल्या या मोर्चाला पोलिसांनी वेळीच रोखले. गोंधळ होण्याची शक्यता लक्षात घेत पोलिसांनी ही कारवाई केली. मात्र, कार्यकर्त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने शेवटी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत उपस्थित होते. तसेच युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू चीब यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

राम मंदिरात प्रभू रामचंद्रांच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठा भारताचे खरे स्वातंत्र्य आहे. प्रभू रामचंद्रांच्या मूर्ती प्राण प्रतिष्ठेचा दिवस हा प्रतिष्ठा द्वादशी म्हणून साजरा करायला हवा. हे अनेक शतकांच्या परकीय आक्रमणानंतर भारताच्या स्वायत्ततेच्या स्थापनेचे प्रतीक आहे. राम मंदिर आंदोलन हे कोणाच्या विरोधात म्हणून नव्हते तर भारताच्या 'स्व'ला जागवण्याचा प्रयत्न होता. भारत देश म्हणून स्वतंत्र उभा राहावा आणि जगाला मार्गदर्शन करू शकेल यासाठीची धडपड होती, असे मोहन भागवत म्हणाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जानेवारी २०२५

## कै .गुरुदयालसिंग राठोड आश्रमशाळे विद्यार्थी निरोप निरोप समारंभ




**कन्नड (अरुण थोरात):** जीवनात आपणास मिळालेले काम, जबाबदारी पूर्ण क्षमतेने पूर्ण करा व यशस्वी व्हा, असे आवाहन सेवानिवृत्त केंद्रप्रमुख श्री साईदास राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. ते दि. १७ जानेवारी रोजी कै. गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेच्या १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. जीवनात यशाला कोणताही शॉर्टकट नाही. कष्ट केल्याशिवाय काहीच मिळू शकत नाही. योग्य वयात जीवन समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करा, थोर पुरुषांची जीवन चरित्रे वाचा त्यामुळे तुम्हाला यशाचा मार्ग निश्चित सापडेल असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले अनुभवकथन केले. आश्रमशाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बी.एफ. जाधव यांनी विद्यार्थ्यांना भावी जीवनात येणाऱ्या आव्हानांना तोंड कशा पद्धतीने द्यावे याचा कानमंत्र दिला. शिक्षक कामेश महाजन, प्रा.चंद्रशेखर शिंदे, सहशिक्षिका अनिता राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव प्रवीण राठोड, प्रमुख पाहुणे म्हणून साईदास राठोड (सेवानिवृत्त केंद्रप्रमुख ), बी. एफ. जाधव ( सेवानिवृत्त मुख्याध्यापक ), माध्यमिक व उच्च माध्यमिक चे मुख्याध्यापक शेखर मांडे, प्राथमिक मुख्याध्यापक ताराचंद राठोड, वसतिगृहाचे अधीक्षक बद्रीनाथ जाधव, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अशोक दूधकर, तर आभार प्रदर्शन प्रा.नंदुलाल कुच्चे यांनी केले.

दि. १८ रोजी आश्रमशाळेच्या प्रांगणात आनंद नगरी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव प्रवीण राठोड यांच्या हस्ते या उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांचे तसेच मॅजिक गेम्स असे विविध स्टॉल्स लावले होते. स्वतः तयार केलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सवर मोठी गर्दी झाली होती. याचा विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आस्वाद घेतला.

## पिशोर येथे भूमिपुत्र करियर अकॅडमीचे थाटात उद्घाटन



**कन्नड (अरुण थोरात):** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संरक्षण दल, पोलीस, रेल्वे पोलीस तसेच विविध शासकीय सेवांच्या क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी पिशोर ता.कन्नड येथे भूमिपुत्र करियर अकॅडमीची स्थापना मोठ्या थाटात करण्यात आली. ग्रामीण भागातील युवकांमध्ये अफाट क्षमता असूनही योग्य मार्गदर्शन व संधींच्या अभावामुळे ती पूर्णत्वास जाऊ शकत नाही, हे लक्षात घेऊन या अकॅडमीची स्थापना करण्यात आली आहे. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी पिशोर नगरीचे माजी सरपंच पी.एम. डहाके होते. तर पिशोर नगरीचे उपसरपंच बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते फीत कापून अकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला व्याख्याते प्रा. डॉ. संजय गायकवाड, शरद कोलते, रवी संकपाळ या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. भूमिपुत्र करियर अकॅडमीचे संचालक ऋषी पवार आणि अमोल मोरे यांच्या कार्याला पिशोर ग्रामपंचायतीने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमामुळे तरुणाईला एक नवी दिशा मिळेल व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी एक मजबूत व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचेस सूत्रसंचालन सागर सोनवणे तर आभार प्रदर्शन विलास लोखंडे यांनी केले. उद्घाटन सोहळ्याला तरुण भूमिपुत्रांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती, जी या उपक्रमाबद्दलची आशा आणि प्रेरणा स्पष्टपणे दाखवत होती. ग्रामीण भागातील विद्यार्थी आता या अकॅडमीच्या माध्यमातून विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत स्वप्नपूर्तीकडे वाटचाल करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## नांदेड जिल्ह्यात भाजपची ताकद जास्त - अशोक चव्हाण

**नांदेड :** महाराष्ट्रात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार आहेत. त्या अनुषंगाने आता पक्षांची तयारी देखील सुरू झाले असल्याचे दिसत आहे. तसेच काही नेत्यांनी स्वबळावर लढणार असल्याचे देखील संकेत दिले आहेत. यावर भाजप नेते व खासदार अशोक चव्हाण यांनी देखील त्यांचे मत व्यक्त केले आहे.

अशोक चव्हाण म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेत नेमके असे लढायचे, याबाबतची भूमिका कार्यकर्त्यांनी निश्चित करायची आहे. कार्यकर्ते जो निर्णय घेतील, तो आम्ही वरिष्ठांना कळवू. मात्र, नांदेड शहर आणि जिल्ह्यात भाजपची ताकद मोठी आहे. जिथे भाजपला अधिक संधी आहे, त्या जागा कोणत्याही परिस्थितीत सोडल्या जाऊ नये, अशी माझी वैयक्तिक भूमिका असल्याचे अशोक चव्हाण यांनी म्हंटले आहे. यावरून त्यांनी नांदेडमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत दिले असल्याचे स्पष्ट होत आहे.

भाजप सदस्य नोंदणीची जिल्हा आढावा बैठक शनिवारी नांदेड येथे पार पडली. यावेळी खासदार अशोक चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यकर्त्यांची इच्छा स्वबळावर लढण्याची असेल तर निवडणूक स्वबळावर लढवू, असे चव्हाण यांनी म्हंटले आहे. त्यामुळे स्थानिक संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीमधील घटक पक्ष आमने सामने येणार असल्याचे चिन्ह दिसत आहेत. आपली ताकद शहरात आहे, जिल्ह्यात आहे. आम्ही घटक पक्षाच्या विरोधात नाही, मात्र आमचा पक्ष वाढवायचा आम्हाला अधिकार आहे. त्यात गैर मानण्यात काहीच कारण नाही, असेही अशोक चव्हाण यावेळी म्हणाले.

दरम्यान, अशोक चव्हाण यांनी शक्तिपीठ महामार्गाला देखील विरोध असल्याचे म्हंटले आहे. नांदेडमधील शेतकऱ्यांचा या महामार्गाला विरोध आहे. अशोक चव्हाण यांनी जे शेतकऱ्यांचे मत आहे, तेच माझे मत असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच येथील शेतकऱ्यांचे काय प्रश्न आहेत व यावर कसा तोडगा काढला जाईल, यावर मुख्यमंत्र्यांना भेटून चर्चा करणार असल्याचे देखील सांगितले आहे.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जानेवारी २०२५


## मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा - श्री प्रभाकर शास्त्री.



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे ,युवकांनी समाजाची सेवा करून देशासमोर एक आदर्श घालून द्यावा ,असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना जालन्याच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विशेष श्रम संस्कार शिबिर शिबिरात सायगाव (डोंगरगाव)येथे स्वच्छता विषयक प्रवचन देताना श्री प्रभाकर शास्त्री महाराज यांनी केले.जेईएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे सायगाव (डोंगरगाव) ता. बदनापुर, जि. जालना येथे आयोजन करण्यात आले असून दि.१८जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता पावनधाम आश्रम चे प्रभाकर शास्त्री महाराज यांच्या स्वच्छता विषयक प्रयोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी श्री प्रभाकर शास्त्री म्हणाले की मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे घरी, दारी, कार्यालयात जिथे झाल तिथे स्वच्छता आपण ठेवली पाहिजे स्वच्छता' जिथे वसे तिथे लक्ष्मी नांदे.'घरे स्वच्छ असल्यास गाव स्वच्छ राहील गाव स्वच्छ राहिल्यास तालुका, जिल्हा स्वच्छ राहील म्हणून भारत सरकारने स्वच्छता विषयक मोहीम राबवली त्याचा घराघरात प्रचार झाला. ज्ञानेश्वरी ,भगवद्गीता वेगवेगळ्या पुराणांमध्ये संत तुकोबांच्या गाथेमध्येही स्वच्छतेचे महत्व सांगितलेले आहे. माणसाने निष्कामपणे समाजाची सेवा केली तर तेच गुण पुढील पिढीमध्ये संक्रमित होता,त पुढच्या पिढीलाही सेवेची सवय लागते, हे फक्त भारतीयांमध्येच दिसते. आज संपूर्ण जग भारताकडे सेवाभाव, दातृत्व वृत्तीचे माहेरघर म्हणून बघते. असेही श्री प्रभाकर शास्त्री यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे,प्रा. डॉ. राजेश सरकटे प्रा. योगेश लहामटे प्रा किशोर तापडिया तसेच गावातील ग्रामस्थ पुरुष महिला व शिबीरार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. गजानन घोडके श्री.भरत अहिरे श्री विजय सुलाने, आनंद काळे, श्री.संतोष उगले आर्दीनी विशेष परिश्रम घेतलेत.

## युवकानी डिजिटल साक्षर होणे ही काळाची गरज आहे - प्रा. युसुफ मुल्ला



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** युवकांनी इतर कौशल्यासोबतच डिजिटल साक्षर असणे ही आज काळाची गरज असुन त्यासाठी शासन सुद्धा अनेक योजना विद्यार्थ्यांसाठी राबवत आहे. विद्यार्थ्यांनी अशा योजनाचा लाभ घेऊन स्वतः साक्षर होणे हि काळाची गरज़ असल्याचे मत मायक्रोकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला यांनी व्यक्त केले. श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय,उमरगाराष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबिर जकेकुरवाडी येथे चालू असून या गुरूवारी (ता.१६) शिबिराच्या दुसऱ्या दिवशी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.युसुफ मुल्ला यांनी "डिजिटल लिटरसी ही काळाची गरज" या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.तंटामुक्त समितीचे सदस्य तानाजी पाटील अध्यक्षस्थानी होते.

प्रमुख पाहुणे म्हणून रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.गिरीधर सोमवंशी, डॉ.भरत शेळके, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा.डी.डी पांढरे, प्रा.एम.डी.गायकवाड डॉ. व्ही. एम.गायकवाड,डॉ. एस. एल राठोड,डॉ आर. एम. सूर्यवंशी प्रा. एस आर. चव्हान,प्रा.विजय पवार उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. मुल्ला म्हणाले की, आज संगणकाने माणसाचे सारे जीवनच व्यापून टाकले आहे. पोस्ट सेवा, बँका, आणि विविध कार्यालयांतील सर्व कामे आत्ता संगणकाद्वारेच केली जातात. ग्राहकांच्या खात्यामध्ये किती ठेव शिल्लक आहे हे आत्ता एका क्लिकवर समजते. रेल्वे, विमाने, चित्रपट यांसारख्या तिकिटांचे आरक्षण संगणकाद्वारेच घरबसल्या करता येते. आजकाल सर्व महत्वाच्या परीक्षा या संगणकाद्वारेच घेतल्या जातात संगणकाद्वारे नोकरीबरोबरच कार्यालयातील कामे सुद्धा काही जन घरीच बसून करतात आणि इंटरनेट च्या मदतीने कार्यालयात पाठवतात असेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भरत शेळके यांनी केले. सूत्रसंचालन शेखर सूर्यवंशी यांनी केले तर उपस्थित आमचे आभार अभिषेक मिसाळ यांनी मांडले.

## भारताचा पुरुष आणि महिला संघ खो-खो चा पहिला विश्वविजेता बनला

**नवी दिल्ली :** भारतीय महिला संघाने खो-खोचा पहिला विश्वचषक जिंकला आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना रविवारी इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम, नवी दिल्ली येथे झाला. भारताने नेपाळचा ७८-४० अशा मोठ्या फरकाने पराभव करत विजेतेपदावर कब्जा केला.

खो-खो विश्वचषक १३ ते १९ जानेवारी दरम्यान नवी दिल्ली येथे खेळला गेला. भारतीय संघ या स्पर्धेत अपराजित राहिला, तर नेपाळला अंतिम फेरीतच पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले. पुरुषांच्या टीम इंडियानेही अंतिम फेरी गाठली असून, त्यांचा सामना नेपाळशी आहे.

महिला खो-खो विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीला रविवारी सायंकाळी सहा वाजता सुरुवात झाली. नेपाळने नाणेफेक जिंकून बचावाचा निर्णय घेतला. भारताने पहिल्या डावात एकतर्फी वर्चस्व दाखवत ३४ गुण मिळवले. दुसऱ्या डावात नेपाळने पाठलाग करत २४ गुण गोळा केले, या टर्नवर भारतालाही एक गुण मिळाला. अर्ध्या वेळेनंतर भारताने ३५-२४ अशा फरकाने आघाडी कायम ठेवली.

तिसऱ्या डावात भारताने आघाडी आणखी वाढवली. या टर्नवर संघाने ३८ गुण मिळवले आणि गुण ७३-२४ असा आपल्या नावे केला. चौथ्या आणि शेवटच्या डावात नेपाळला केवळ १६ गुण करता आले, तर भारताचे ५ गुण झाले. ७८-४० च्या स्कोअर लाइनसह अंतिम सामना संपला आणि भारतीय महिला संघ पहिला विश्वचषक विजेता ठरला.

महिला गटात १९ संघ सहभागी झाले होते. भारतीय महिला इराण, मलेशिया आणि दक्षिण कोरियासह अ गटात होत्या. संघाने दक्षिण कोरियाचा १७६-१८, इराणचा १००-१६ आणि मलेशियाचा १००-२० अशा मोठ्या फरकाने पराभव केला. या संघाने गटात अव्वल स्थान पटकावले आणि उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. उपांत्यपूर्व फेरीत भारताने बांगलादेशचा १०९-१६ अशा फरकाने पराभव केला. उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना ६६-१६ असा जिंकला. अंतिम फेरीतही भारतीय महिलांचे वर्चस्व दिसून आले आणि संघाने ७८-४० अशा फरकाने सामना जिंकला. संपूर्ण स्पर्धेत नेपाळ हा एकमेव संघ होता, ज्याचे भारताविरुद्धच्या पराभवाचे अंतर ५० गुणांपेक्षा कमी होते.

खो-खो विश्वचषकाच्या पुरुष आणि महिला अशा दोन्ही स्पर्धांमध्ये भारताचे वर्चस्व राहिले. पुरुष संघानेही अपराजित राहून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. नेपाळचा या स्पर्धेतील एकमेव पराभव ग्रुप स्टेजमध्ये भारताविरुद्ध झाला होता.

भारताच्या गटात पेरू, ब्राझील, भूतान आणि नेपाळ यांचा समावेश होता. संघाने नेपाळचा ४२-३७, ब्राझीलचा ६६-३४, पेरूचा ७०-३८ आणि भूतानचा ७१-३४ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत भारताने श्रीलंकेवर १००-४० अशा फरकाने विजय मिळवला. त्याचवेळी संघाने उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा ६२-४२ असा पराभव केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जानेवारी २०२५


# श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध कार्यशाळा व कार्यक्रमांचे आयोजन





**जालना :** मराठी भाषा ही सर्व शाखा अध्ययनाचे माध्यम व्हावे. प्राचार्य डॉ.प्रसाद मदनदेशात नवीन शैक्षणिक धोरण लागू झाल्याने सर्व अध्ययन शाखांची दारे विद्यार्थ्यांसाठी खुली झालेली आहे. म्हणून मराठी भाषा ही सर्व शाखा अध्ययनाचे मध्यम व्हावे. असे प्रतिपादन वाचन संकल्प महाराष्ट्राचा जालना जिल्हा समिती सदस्य तथा व्ही.एस.एस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांनी केले. येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि ग्रंथालय व माहिती विभागाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर, उद्घाटक म्हणून वाचन संकल्प महाराष्ट्राचा जालना जिल्हा समिती सदस्य तथा व्ही.एस.एस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसाद मदन हे होते. तर विशेष उपस्थिती म्हणून महाराष्ट्राचा जालना जिल्हा समिती सदस्या डॉ.विद्या पटवारी होत्या. यावेळी मंचावर आयक्यूएसी समन्वयक तथा मराठी भाषा व वाङ्मय विभाग प्रमुख डॉ. वासुदेव उगले, ग्रंथालय व माहिती विभागाचे प्रमुख प्रा. राहुलनंदकिशोर सानप यांची विशेष उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ मदन म्हणाले की, शासनाच्या वतीने या वर्षापासून वाचन संकल्प पंधरवाडा व त्या सोबतच मराठी भाषा संवर्धन पंधरवडा असा संपूर्ण एक महिन्यांचा कार्यक्रम मराठी भाषेच्या व ग्रंथ वाचनाच्या अनुषंगाने महाराष्ट्रभर राबविण्यात येत आहे.

मराठी भाषा ही सर्वसामान्य पातळीवर सुद्धा खऱ्या अर्थाने अभिजात भाषा व्हावी ती केवळ कागदांमध्येच अभिजात असू नये या उद्देशाने हे उपक्रम राबविण्यात येत आहेत आपण सर्वांनी ही या कार्यक्रमाचा व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने व स्वतःच्या भाषिक विकासाच्या दृष्टीने फायदा करून घ्यावा असेही ते यावेळी म्हणाले.विशेष उपस्थिती म्हणून उपस्थित असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राच्या जालना जिल्हा समिती सदस्या डॉ. पटवारी यांनी महाराष्ट्र गीताचे धृवपद गुणगुणत मराठी आणि महाराष्ट्र यांचे अतुट नाते विद्यार्थिनी समोर उलगडले. बहिणाबाई यांच्या कवितेच्या ओळी मधुन संघर्ष हेच जीवन आहे. तसेच वाचाल तर वाचाल या व्यक्तीनुसार वाचनाचे व्यक्ती जीवनातील महत्त्व विद्यार्थिनींना पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रस्ताविकपर मनोगतात डॉ. उगले यांनी मराठी भाषा व प्रसार माध्यमाची सांगड घालून मराठी भाषेचे संवर्धन करता येईल असा भविष्यवेध घेतला. राजकीय व शासकीय पातळीवरून मराठी भाषेला अभिजात दर्जा प्रदान करण्यात आला असला तरी सर्वसामान्य व्यवहारिक पातळीवर मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा देण्याचे कार्य सर्वसामान्य माणसांचे आहे. मराठी भाषा संवर्धन ही कुण्या एकट्या दुखते ची जबाबदारी नसून ती सर्वच मराठी मातृभाषकांची जबाबदारी आहे त्यामुळे स्वतःचे अस्तित्व व अस्मिता टिकविण्यासाठी आपली मातृभाषा म्हणून मराठीला व्यावहारिक पातळीवर वृद्धिंगत करणे आवश्यक आहे.

पुढे बोलताना डॉ. उगले म्हणाले की, या पंधरवड्याच्या कार्यक्रमांमध्ये विकिपीडिया लेखन, ब्लॉग लेखन, शुद्ध मराठी भाषण स्पर्धा, युनिकोड वापर तंत्र, ई बुक्स आणि ऑडिओ बुक्स यांची ओळख, समाज माध्यमांवरील रोजगाराच्या संधी आदि विषयावर उपक्रम आयोजित केले जाणार आहेत.अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.तळेकर म्हणाले की, मराठी भाषेत ज्ञानाचा उत्कृष्ट खजिना असलेली पुस्तके आहेत. त्यांच्या वाचनातून विद्यार्थ्यांनी आपले मस्तक सशक्त व समृद्ध करून घ्यावे. वाचनातून सशक्त झालेली मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नसतात.या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पार्वती देशमुख यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रवीण घुगे यांनी व आभार प्रा. शीला कवडे यांनी प्रकट केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. पापाजी चव्हाण, प्रा. सचिन शेवतेकर, श्री.एकनाथ फुपाटे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनीची मोठ्या अंभोरे, श्री. संख्येने उपस्थित होती.

# रायगडच्या पालकमंत्री पदावरून वाद; पदाधिकाऱ्यांनी दिले राजीनामे

**नांदेड :** राज्यातील पालकमंत्र्यांची यादी शनिवारी रात्री जाहीर करण्यात आली. त्यानंतर अनेकांना पालकमंत्री पद मिळण्याची अपेक्षा होती, मात्र त्यांना न मिळाल्याने नाराजीचे सुर उमटताना दिसत आहेत. विशेष म्हणजे रायगडचा पालकमंत्री म्हणून शिवसेना शिंदे गटाचे नेते व रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांची निवड होणार अशी चर्चा होती, पण त्यांना वगळण्यात आले आहे. रायगडच्या पालकमंत्री पदावर अदिती तटकरे यांची निवड करण्यात आली आहे. यामुळे भरत गोगावले यांचे समर्थक चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसत आहे.

मंत्री भरत गोगावले यांच्या समर्थकांनी शनिवारी रात्री पासूनच महाड जवळील मुंबई गोवा महामार्गावर टायर जाळून या निर्णयाचा निषेध व्यक्त केला आहे. रविवारी सकाळी रायगड जिल्ह्यातील एकूण 32 गोगावले समर्थक आणि पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पदाचे राजीनामे देखील दिले आहेत. यामुळे महायुतीमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, भरत गोगावले यांनी त्यांच्या रायगड येथील शिवनेरी निवासस्थानी कार्यकर्त्यांसोबत बैठक आयोजित केली होती. या बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच प्रशासनाला कोणत्याही स्वरूपात गालबोट लागणार नाही याची काळजी घेण्यासही त्यांनी सांगितले आहे. असे असताना देखील अनेक कार्यकर्त्यांनी राजीनामे दिले आहेत.

कार्यकर्त्यांशी संवाद साधताना भरत गोगावले म्हणाले, आपल्याला रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळालं नाही म्हणून एवढी काळजी करू नका तुमचे माझ्यावर अनंत उपकार आहेत आणि ते मी कधीच विसरणार नाही अशा शब्दात भरत गोगावले यांनी संतापलेल्या शिवसैनिकांची मन जिंकली. भरत शेठ हा तुमचा शेठ आहे मी इतर कोणाचा शेठ नाही असे भावनिक आवाहन करत भरत गोगावले यांनी कार्यकर्त्यांना यावेळी शांत केले. पालकमंत्री पदाच्या निर्णयावर माझी वरिष्ठ मंडळींसोबत चर्चा सुरू आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले आहे.

# सोमनाथ सूर्यवंशीला न्याय देण्यासाठी परभणीपासून मंत्रालयापर्यंत लाँगमार्च

**परभणी :** सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू होऊन एक महिना झाला, तरी दोषी पोलिसांवर कारवाई झालेली नाही. या घटनेतील सर्व दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी आंबेडकरवादी नेते आणि संघटनांनी लाँगमार्च काढण्याचा निर्णय घेतला. शुक्रवारी दुपारी परभणीतील धरणे आंदोलन स्थळावरून हालाँगमार्च दुपारी 3 वाजता मुंबईतील मंत्रालयाकडे रवाना झाला. त्यात हजारोअनुयायी सहभागी झाले आहेत. लाँगमार्चरवाना होण्यापूर्वी पोलिस आणि आंदोलकांमध्ये झालेली बैठक निष्फळ ठरली.

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी अद्यापही चौकशी अत्यंत संथगतीने चालू आहे. चौकशी कुठपर्यंत आली याबद्दल माहिती प्रशासनाने दिलेलीनाही. सूर्यवंशी आणि वाकोडे कुटुंबीयांना एककोटीची नुकसान भरपाई द्यावी, दंगलीत विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हे त्वरित मागेघ्यावे, दोषी असणाऱ्यांवर कारवाई करावी, याप्रमुख मागण्यांसाठी आंबेडकरी अनुयायांनी लाँगमार्च काढण्याचा निर्णय घेतला. शुक्रवारी17 जानेवारीला परभणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून सुरुवात झाल्यानंतरहा लाँगमार्च मंत्रालयापर्यंत जाणार आहे. लाँगमार्च जसा पुढे जाईल, तशी सहभागी आंदोलकांची संख्या वाढेल, असे संयोजन समितीने सांगितले आहे. सुधीर साळवे, आकाश लहाने, राहुलकुमार साळवे, गौतममुंढे, सुधीर कांबळे यांच्यासह हजारो अनुयायी सहभागी झाले आहेत.